तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'आनंदी श्रेष्ठत्व-ज्येष्ठत्व'च्या प्रकाशन प्रसंगी काडसिद्धेश्वर स्वामी, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, श्रीकांत आडिवरेकर, डॉ. आण्णासाहेब गुरव व डॉ. केदार मारुलकर.

# ज्येष्ठांनी नव्या पिढीला मार्गदर्शन करावे

## कणेरीमठाचे काडसिध्देश्वर स्वामी यांचे आवाहन

प्रतिनिधी

कोल्हापूर

ज्येष्ठ नागरिकांनी अनुभवाच्या आधारे सामाजिक कार्यामध्ये योगदान द्यावे. नवी पिढी घडवण्यासाठीही मार्गदर्शन करावे, असे प्रतिपादन कणेरीचे मठाधिपती काडसिद्धेश्वर स्वामी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे डॉ. आण्णासाहेब गुरव आणि श्रीकांत आडिवरेकर यांनी लिहीलेल्या 'आनंदी श्रेष्ठत्व-ज्येष्ठत्व' पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. विद्यापीठातील मानव्यशास्त्र हॉलमध्ये झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.

काडसिद्धेश्वर स्वामी म्हणाले, ज्येष्ठत्व हे वयावर नव्हे, तर अनुभवावर अवलंबून असते. त्यामुळे आपले श्रेष्ठ वर्तन, आचार, राहणीमान याव गोष्टी आपल्याला अनुभवसमृद्ध बनवतात आणि हे श्रेष्ठत्व माणसाला ज्येष्ठपदी घेऊन जाते. भावी पिढ्यांचे दिग्दर्शन ही ज्येष्ठ पिढीने ज़बाबदारी मानावी. त्यासाठी आपले अचूक जीवनच पुढील पिढ्यांसाठी आदर्श असावे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, माणसाने चांगले आयुष्य जगण्यासाठी चांगल्या सवयी अंगी बाणवल्या पाहिजेत. आयुष्यभर इतरांसाठी कष्टत असताना स्वत:च्या सुखी व निरोगी जीवनासाठी काही गोष्टी जाणीवपूर्वक केल्या पाहिजेत. थोडे आयुष्य स्वत:साठीही जगायला शिकलेच पाहिजे.

श्रीकांत आडिवरेकर, डॉ. आण्णासाहेब गुरव यांनी पुस्तकाविषयी माहिती दिली. डॉ. केदार मारुलकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. यावेळी डॉ. डी. के. मोरे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. दीपा इंगवले आदी उपस्थित होते.

सकाळ

# 'डीकेटीई'स स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा

इचलकरजी, ता. ५ : शिवाजी विद्यापीठाकडून डीकेटीईच्या टेक्स्टाईल अँण्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटला शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा मिळाला आहे. यामुळे विद्यापीठ व महाविद्यालयाची एकत्रित पदवी प्रदान करणे शक्य होणार आहे.

शिवाजी विद्यापीठाकडून परिपत्रक काढून स्वायत्त महाविद्यालयाकडून अधिकारप्रदत्त दर्जासाठी अर्ज मागवले होते. प्राप्त अर्जाची छाननी करून डीकेटीईचा अर्ज यात पात्र ठरला. विद्यापरिषदेच्या शिफारशीने व्यवस्थापन परिषदेने हा अर्ज मान्य केला.

डीकेटीई महाविद्यालयाला त्यांच्या स्वायत्तेच्या कालावधी इतका अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा दिला आहे. यामुळे महाविद्यालयाचे एकत्रित पदवी प्रदान करण्याबरोबरच, नवीन प्रमाणपत्र, पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणे अधिक सुलभ होणार आहे. विशेष म्हणजे, विद्यापीठाच्या मंजुरीने डीकेटीईस पीएचडीचे अभ्यासक्रमही सुरु करता येणार आहेत. अभ्यासक्रमासाठी शुल्क रचना निर्धारित करणे अशा अनुषांगिक बार्बीसाठीचे स्वातंत्र्यही मिळणार आहे. इंडस्ट्रीच्या गरजेनुसार अभ्यासक्रमात बदल करणे, त्याची पुनर्रचना करणे, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नामाभिधानाप्रमाणे अभ्यासक्रमांची नावे बदलणे, मूल्यांकनाची पद्धत निश्चित करणे, निकाल जाहीर करणे, गुणपत्रके बहाल करणे याची मुभाही डीकेटीईस मिळणार आहे.

यासाठी संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, आमदार प्रकाश आवाडे, खजिनदार प्रकाश दत्तवाडे, मानद सचिव डॉ. सपना आवाडे व विश्वस्त यांचे मार्गदर्शन मिळाले. इन्स्टिट्यूटच्या प्रभारी संचालिका प्रा. डॉ. एल. एस. आडमुठे, डेप्युटी डायरेक्टर प्रा. डॉ. यू. जे. पाटील, आदींचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

05 JUL 2023

महासत्ता

# डीकेटीईस अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा प्राप्त

इचलकरंजी,ता.४–

शिवाजी विद्यापीठ यांचेकडून डीकेटीईच्या टेक्स्टाईल अँड इंजिनिअरींग इन्स्टिटयूटला शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पासून अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा दिला आहे. या दर्जामुळे विद्यापीठ व महाविद्यालयाचे एकत्रित पदवी प्रदान करणे शक्य होणार आहे. नव्या शैक्षणिक धोरणानुसार मिळालेली ही शैक्षणिक स्वायत्तता विद्यार्थी हिताची ठरणार आहे.

शिवाजी विद्यापीठाकडून परिपत्रक काढून स्वायत्त महाविद्यालयाकडून अधिकारप्रदत्त दर्जासाठी अर्ज मागविले होते. विद्यापीठास प्राप्त झालेल्या अर्जाची रितसर छाननी करून डीकेटीई स्वायत्त महाविद्यालयाचा अर्ज यात पात्र ठरला. पात्र अर्ज विद्यापरिषदेच्या शिफारशीने



व्यवस्थापन परिषदेने मान्य केला.

विद्यापीठ अनुदान आयोग आणि राज्य शासनाच्या अधिसुचनेनुसार उत्कृष्टताक्षम आणि उच्चस्तरीय दर्जा प्राप्त केलेल्या विद्यापीठांशी संलग्नित डीकेटीई महाविद्यालयाला त्यांच्या स्वायत्तेच्या कालावधी इतका अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा देण्यात आला आहे. यामुळे महाविद्यालयाचे एकत्रित पदवी प्रदान करण्याबरोबरच, नविन प्रमाणपत्र, पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणे अधिक सुलभ होणार आहे. विशेष म्हणजे, विद्यापीठाच्या मंजुरीने डीकेटीईस पीएचडीचे अभ्यासक्रम देखील सुरु करता येतील आणि या अभ्यासक्रमासाठी शुल्क रचना निर्धारित करणे, अशा अनुषांगिक बाबी साठीचे स्वातंत्र्य देखील मिळणार आहे. इंडस्ट्रीच्या गरजेनुसार अभ्यासक्रमात बदल करणे, त्याची पुर्नरचना करणे, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नामाभिधानाप्रमाणे अभ्यासक्रमांची नांवे बदलणे, मुल्यांकनाची पध्दत निश्चित करणे, निकाल जाहीर करणे, गुणपत्रके बहाल करणे याची मुभा देखील डीकेटीईस मिळणार आहे.

यासाठी संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, आमदार प्रकाश आवाडे, खजिनदार प्रकाश दत्तवाडे, मानद सचिव डॉ.सौ.सपना आवाडे व सर्व विश्वस्त यांचे मार्गदर्शन मिळाले. इन्स्टिटयूटच्या प्र.संचालिका प्रा.डॉ सौ. एल.एस.आडमुठे, डे.डायरेक्टर प्रा. डॉ. यु. जे. पाटील, सर्व डीन्स, सर्व विभाग प्रमुख,प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी,माजी विद्यार्थी यांचा या यशात मोलाचा वाटा आहे.